# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)**

# Savitribai Phule Pune University

**(formerly University of Pune)**

## नोंदणीकृत पदवीधरांची अधिसभेवरील निवडणूक

**जाहीर प्रकटन**

**- संदर्भ क्र.साफुपुविनि/३०, दिनांक १० जून, २०१७ -**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६, कलम २८(२) (न) २८(२) (t) व कलम १३१ मधील तरतुदीनुसार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे दहा (१०) नोंदणीकृत पदवीधर **(Registered Graduates)** अधिसभेवर **(Senate)** निवडून द्यावयाचे आहेत. त्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पदवीधारकांकडून नोंदणीकृत पदवीधर म्हणून नाव नोंदणीसाठी, मतदार यादी तयार करण्याकरिता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या **election.unipune.ac.in** या संकेतस्थळावर **online** पद्धतीने **सोमवार, दिनांक १२ जून, २०१७ ते मंगळवार, दिनांक ११ जुलै, २०१७** या कालावधीत अर्ज मागविण्यात आलेले असून सदर अर्जाची छापील प्रत आवश्यक त्या कागदपत्रांसह **मंगळवार, दिनांक १८ जुलै, २०१७** पर्यंत स्वीकारण्यात येणार होते.

याबाबत सर्व संबंधितांना या जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पदवीधारकांकडून नोंदणीकृत पदवीधर म्हणून नाव नोंदणीसाठी, मतदार यादी तयार करण्याकरिता ऑनलाईन नोंदणीची मुदत **शनिवार, दिनांक २२ जुलै, २०१७ पर्यंत** वाढविलेली असून सदर अर्जाची छापील प्रत आवश्यक त्या कागदपत्रांसह **शनिवार, दिनांक २९ जुलै, २०१७** पर्यंत निवडणूक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - ४११००७ किंवा यापूर्वी जाहीर केलेल्या नोंदणीकृत पदवीधर नोंदणी मदत केंद्रावर कार्यालयीन वेळेत (कार्यालयीन सुट्टीचे दिवस वगळून) स्वीकारण्यात येणार आहेत.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पदवीधारकांकडून नोंदणीकृत पदवीधर म्हणून नाव नोंदणीसाठी, मतदार यादी तयार करण्याकरिता **शनिवार, दिनांक २९ जुलै, २०१७** नंतर आलेले अर्ज, अपूर्ण अर्ज, नव्याने नोंदणीकृत पदवीधर होण्यासाठीचे विहित शुल्क न भरलेले तसेच आवश्यक ती कागदपत्रे न जोडलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्वीकारले जाणार नाहीत, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

गणेशखिंड, पुणे ४११ ००७
संदर्भ क्र. : साफुपुविनि/५३
दिनांक : ११/०७/२०१७

११।७।१७
**(डॉ.अरविंद दिगंबर शाळीग्राम)**
**प्रभारी कुलसचिव**